महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
" कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०११६/११८ Extn-४११ EMail ID :- aotm-dat@mah.gov.in

क्र.लेको/कोषा/सलेअ-१/नस्ती क्र.१४/प्रोत्साहन भत्ता/२०२५/५६४ दिनांक : 17 OCT 2025

प्रति,

सहसंचालक,
लेखा व कोषागारे,
नागपूर/कोकण/नाशिक/पुणे/अमरावती/छत्रपती संभाजी नगर विभाग. **(ई-मेल द्वारे)**

विषय : आदिवासी भागामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लागू करण्याबाबत.

संदर्भ : १. सहसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र. कोष/कोप्र.४ /न.क्र.६१३/ १४६४/ २०२० दि.०१.१०.२०२०.
२. संचालनालयाचे पत्र क्र. संलेको/उ.ले-१/कोषा-२६/एकस्तर-प्रोत्साहन भत्ता /२०२० /२०४ दि.२७.१०.२०२०.
३. सहसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र. ससंलेवको /कोप्र.४ /गड /प्रोत्साहन भत्ता /न.क्र.४-६१३/ २०२५ /१७३० दि.१७.०७.२०२५.
४. सहसंचालक,कोकण भवन यांचे पत्र क्र. ससंलेको /कोवि /कोनि / टि.स.२/प्रोत्साहन भत्ता पालघर/संकिर्ण-१/२०२५-२६/१४२४ दि.०१.०८.२०२५.
५. संचालनालयाचे पत्र क्र. संलेको/कोषा/सलेअ-१/नस्ती क्र.१४/न्या.प्र. /प्रोत्साहन भत्ता/२०२५/४३८/४११ /३३८० दि.०४.०८.२०२५.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आदिवासी/नक्षलग्रस्त भागात चांगल्या, होतकरु व कार्यक्षम अधिका-यांच्या नेमणूकी साठी मार्गदर्शक तत्वे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०६.०८.२००२ नूसार निर्गमित करण्यात आलेली आहेत. सदरील शासन निर्णयामधील परिच्छेद २ (ब) नूसार नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील असे नमूद आहे. याअनुषंगाने सदर प्रोत्साहन भत्ता ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावा अथवा ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे अदा करण्यात यावा याबाबत मार्गदर्शन मिळण्याबाबत नागपूर विभाग व कोकण

विभाग यांचेकडून संदर्भ क्र. १ व ३ च्या पत्रान्वये संचानालयास विनंती करण्यात आली होती.

यानुषंगाने आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भ क्र.२ च्या दि.२७.१०.२०२० च्या पत्रान्वये यापूर्वीच सर्व सहसंचालक लेखा कोषागारे तसेच कोषागारांना सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत : दि.२७.१०.२०२० चे पत्राची प्रत.

**( दीपा देशपांडे )**
**संचालक**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र, मुंबई.**

प्रत : सर्व कोषागार अधिकारी यांना माहितीसाठी रवाना. **(ई-मेल द्वारे)**

5515

1241/15

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
ठाकरसी हाऊस, 3 रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट-मुंबई
दूरध्वनी क्र २२६२२०२९-०२२/२२६२२०३६-०२२ Email.- jd.admin@mahakosh.in

क्र.संलेको/उ.ले-१/ कोषा-२६/एकस्तर-प्रोत्साहन भत्ता/२०२०/204 दिनांक : 27 OCT 2020

प्रति,

सहसंचालक,

लेखा व कोषागारे,

नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक/पुणे/कोकण विभाग

(ई-मेल द्वारे)

**विषय:-** आदिवासी भागामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानूसार मुळ वेतनाच्या १५ टक्के किंवा कमाल रु १५००/- प्रोत्साहर भत्ता अदा करणे बाबत.

**संदर्भ:-** सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचे पत्र क्र. कोष/कोप्र-४/न.क्र.६३ /१४६४/२०२० दि १.१०.२०२०.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये संदर्भ क्र.१ नुसार शासनाने नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-कार्यक्षम अधिका-यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक विहित तत्वे व विविध सवलतीचे एकत्रित आदेश निर्गमित केलेले आहेत. आदिवासी भागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना मुळ पदाच्या नजीकची वरिष्ठ / पदोन्नतीची वेतनश्रेणी देय आहे. तसेच मुळ वेतनाचे १५ टक्के किंवा रु १५००/- प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे. कोषागार कार्यालय, भंडारा, गोंदिया यानी सातव्या वेतन आयोगाचे संरचने नूसार प्रोत्साहन भत्ता मिळणे बाबत सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचेकडे विचारणा केलेली आहे.

सहसंचालक, नागपूर यांनी मुळ वेतनाचे १५ टक्के किंवा रु १५००/- प्रोत्साहन भत्ता पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे किंवा सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे याबाबत मागदर्शन मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

प्रोत्साहन भत्ता देण्याबाबतचे आदेश शासन स्तरावरुन अद्याप निर्गमित करण्यात आलेले नाहीत. तरी याबाबत सातव्या वेतन आयोगाचे वेतन संरचने नुसार प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत शासनाने आदेश निर्गमीत केलेले नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा दि.०६.०८.२००२ नुसार प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावे असे सहसंचालकांनी त्यांचे अधिनस्त कोषागार कार्यालयांना कळविण्यात यावे.

(ज. र. मेनन)
संचालक
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई.

प्रत : कोषागार अधिकारी, सर्व
यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना.